# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/03/2023 (मंगळवार) सकाळ


---

## चोरी

**पोस्टे. एम.आय.डी.सी बोरी** :– अंतर्गत नवरत्न इंडस्ट्रीज कंपनी येथे दिनांक १२/०३/२०२३ चे ००.०० वा. ते दिनांक २०/०३/२०२३ चे ००.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– संदीप नामदेवराव दूरबुडे, वय ४० वर्ष, रा. यशवंत नगर, हिंगनघाट जि. वर्धा हे नवरत्न इंडस्ट्रीज कंपनी मध्ये प्रोडक्शन मॅनेजर म्हणुन काम बघतात. कंपनी मध्ये रात्री एक गार्ड कंपनीत असते. नमुद घटना वेळी व ठिकाणी फिर्यादी हे कंपनीत चेक करायला गेले असता कंपनीत मशिन नव्हत्या कंपनीतील उघडया जागेवर ठेवलेल्या वेल्डींग आर्क मशीन ४००A चे ०३ नग किंमती अंदाजे ४५०००/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी रामेश्वर राय मो. नं. ९९२३४२४७६७ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. बोरी** :– दिनांक १९/०३/२०२३ चे १७.०० वा. दरम्यान पो.स्टे. बोरी हद्दीत फिर्यादीचा मोठा मुलगा १७ वर्ष ११ महिने अल्पवयीन मुलगा हा दि. १९/०३/२०२३ ला सायंकाळी ५.०० वा. दरम्यान घरात कोणालाही काहीही न सांगता बाहेर गेला रात्री घरी परतला नाही त्याचा बुट्टीबोरी परिसरात बसस्टॉप, रेल्वे स्टेशन, जिथे तो टयुशनला जातो तिथे व मित्रांकडे शोध घेतला परंतू तो मिळून आला नाही. त्याला कोणीतरी अज्ञात ईसमाने फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि संजय खंडारे पोस्टे बोरी मो. नं. ९९२३१५९१५३ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर